दिनांक 07/07/2025 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 67

विषय – दूरसंचार कायदा 2023 आणि दूरसंचार नियम 2024 ची अंमलबजावणी करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक 30/06/2025 रोजी मंजूर केलेली टिपणी.
2) इंडस टॉवर लि. यांचे पत्र आवक क्र. 1596 दि. 09/06/2025
3) महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.दुपासु-2025 /प्र.क्र.10 / नवि-20 दि 05 फेब्रुवारी 25
4) दूरसंचार कायदा 2023
5) नम्रता वि मुंदडा कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन यांचेकडील क्र.संकिर्ण-2021/ प्र.क्र.242/नवि-20 दिनांक 21 मे 2025

(1) संदर्भ क्र. 2 इंडस टॉवर लि. यांचे दि. 09/06/2025 रोजी प्राप्त झालेल्या पत्रामध्ये पुढील प्रमाणे नमूद करण्यात आलेले आहे. अलिकडे दूरसंचार कायदा 2023 लागू करणेत आलेला आहे, जो खाजगी किंवा सार्वजनिक मालमत्तेवर दूरसंचार टॉवर उभारणे, चालवणे किंवा देखभाल करणेसाठी लागू आहे. त्यामध्ये कलम 14 व कलम 52 केंद्र सरकारने अधिसूचित केलेली आहे.

कलम 14(3) मध्ये स्पष्टपणे नमूद आहे की, कोणत्याही मालमत्तेवर उभारलेले दूरसंचार नेटवर्क ही मालमत्तेचा भाग समजली जाणार नाही व त्यावर कोणताही व्यवहार, मालमत्ता कर, शुल्क, उपकर, सेस, फी किंवा इतर कोणतीही आर्थिक देणी आकारता येणार नाहीत. म्हणून दूरसंचार नेटवर्क वर मालमत्ता कर लावता येणार नाही. महाराष्ट्र शासनाने दि. 05 फेब्रुवारी 2025 रोजीच्या शासन निर्णयाद्वारे दूरसंचार कायदा 2023 व दूरसंचार नियम 2024 लागू केले आहेत. त्यामधील नियम 9 (9) आणि 15(3) नुसार, सार्वजनिक संस्थांनी (राज्य सरकार, स्थानिक स्वराज्य संस्था इत्यादी) कोणतेही शुल्क, भाडे, गॅरंटी, आर्थिक योगदान, मोबदला इत्यादी आकारू नये अशी तरतूद करणेत आलेली आहे. नवीन दूरसंचार नियमानुसार मोबाईल टॉवर संबंधी कर आकारणी सुधारीत करावी आणि सन 2025-23 व पुढील आर्थिक वर्षासाठी मोबाईल टॉवरसाठी मालमत्ता कर बीले जारी करू नये.

(2) दूरसंचार कायदा 2023 चे कलम 14 मध्ये पुढील प्रमाणे तरतूद करण्यात आलेली आहे.

(1) A facility provider shall not have any right, title or interest in the property on which telecommunication network is established, except the right to use the property as provided under section 11 or section 12.

पान नं.2 वर

(2) The telecommunication network installed on any property, shall not be subject to any claims, encumbrances, liquidation or the like, relating to such property.

(3) The telecommunication network installed on any property, shall not be considered as part of such property, including for the purposes of any transaction related to that property, or any property tax, levy, cess, fees or duties as may be applicable on that property.

(4) Notwithstanding anything contained in any other law for the time being in force, no public entity, except with the permission of an officer authorised by the Central Government for this purpose, shall have the authority to take any coercive action, such as sealing, preventing access, or forcible shutdown of the telecommunication network established by an authorised entity, except where such actions may be necessary to deal with any natural disaster or public emergency.

3) संदर्भ क्र. 3 अन्वये महाराष्ट्रातील सर्व नगरपालिकामधील केंद्र शासनाचा दूरसंचार कायदा 2023 व दूर संचार नियम 2024, दि. 10 जानेवारी 2025 पासून अंमलबजावणी करण्यात येत असल्याचे नमूद केले आहे.

विटा नगरपरिषद हद्दीमध्ये सद्य स्थितीत विविध कंपन्यांचे एकूण 31 मोबाईल टॉवरची अभिलेख सदरी नोंद आहेत. सदर मोबाईल टॉवर वरील एकूण मालमत्ता कराची माहे जून 2025 अखेर 12,63,042/- एवढी रक्कम थकबाकी आढळून येत आहे. त्याची यादी पुढील प्रमाणे सादर करीत आहे.

| अ.क्र. | जुना मिळकत क्रमांक. | नविन मिळकत क्रमांक | मिळकत धारकांचे नाव | थकबाकी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 6/4 | 1000013 | महमद तांबोळी इंडस टावर | 98698 | |
| 2 | 166/1 | 1000234 | गुळवणी & देवकर रिलायन्स इंफ्रो | 100191 | |
| 3 | 42/1 | 1001777 | अमृत कुलकर्णी रिलायन्स | 0 | |
| 4 | 7905/1/a | 2002458 | हरीश शिवाजी पवार रिलायन्स जिओ | 0 | |
| 5 | 1774/2 | 4002173 | रामचंद्र कृष्णाजी माळी रिलायन्स इंफ्रो | 154674 | |
| 6 | 1785/4 | 4002180 | जगन्नाथ बाळू जाधव इंडियन टेलिकॉम | 77296 | |
| 7 | 1935/1 | 4002269 | नंदकुमार पाटील बिर्ला एटीएनटी | 52586 | |

पान नं.3 वर

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 1939/क | 4002285 | आनदाराव जगन्नाथ कदम टाटा लि. | 24480 | |
| 9 | 4158/2ब | 4002888 | जालीधर कांबळे रिलायन्स टावर | 0 | |
| 10 | 4087/3/अ | 4002978 | माणिक गोविंद शितोळे इंडस टावर | 162218 | |
| 11 | 200/अ | 5002131 | राजकुमार निवृत्ती मगदुम इंडस टावर | 53065 | |
| 12 | 2328/3/1 | 5002320 | विकास लक्ष्मन घोडके रिलायन्स जिओ | 92760 | |
| 13 | 2155/3/1 | 5002270 | पांडुरंग भैरू साळुंखे रिलायन्स जिओ | 0 | |
| 14 | 2783/1 | 6001768 | प्रसाद जालीधर गायकवाड रिला. जिओ | 0 | |
| 15 | 2828/1 | 6001199 | प्रसाद जालीधर गायकवाड भारती सेलुलर | 30295 | |
| 16 | 2828/4 | 6001200 | प्रसाद जालीधर गायकवाड सेन्चुरी इन्फ्राटेली | 29043 | |
| 17 | 6222/1 | 6001908 | अशोक नामदेव यादव इंडस टावर | 104575 | |
| 18 | 3055/1/अ | 7001611 | दिलावर नाबिलाल तांबोळी इंडस टावर | 52983 | |
| 19 | 3609/1 | 8002266 | मुरादअली पटेल बी एस एन एल टावर | 58268 | |
| 20 | 5908/1 | 8002158 | हिंदुराव सावंत रिलायन्स जिओ | 0 | |
| 21 | 5724/5 | 8002245 | सदाशिव राऊ सपकाळ रिलायन्स जिओ | 0 | |
| 22 | 5409/1 | 9001421 | नारायण पाटील इंडस टावर | 41367 | |
| 23 | 3770/1 | 9001472 | लालासो शामराव कदम रिला. जिओ | 0 | |
| 24 | 7418/1अ | 10001083 | देविदास भिमर & सूर्यवंशी इंडस टावर | 0 | |
| 25 | 7452/1 | 10001085 | किशोर प्रकाश डोंबे इंडस टावर | 40492 | |
| 26 | 7325/4 | 10001301 | ज्योतिराम जगन्नाथ रावताळे रिला.जिओ | 0 | |
| 27 | 4829/2 | 1100112 | जेतीराम सुखदेव पवार रिलायन्स जिओ | 0 | |
| 28 | 6551/6 | 12000779 | सारिका काटकर इंडस टावर | 41367 | |
| 29 | 6885/3 | 12001030 | जालीधर बा. पाटील इसार इन्फ्रा टेली | 48684 | |
| 30 | 7110/2अ | 12001880 | विकास तुकाराम शितोळे रिलायन्स जिओ | 0 | |
| 31 | 6641/2 | 12001979 | राजकुमार ज्योतीराम पाटील रिला. जिओ | 0 | |
| | | | एकुण रक्कम रुपये | 12,63,042/- | |

पान नं.4 वर

4) उपरोक्त संदर्भ क्र. 2 ते 5 अन्वये सदर मोबाईल टॉवर वर आर्थिक वर्ष सन 2025-26 पासून मालमत्ता कराची आकारणी बंद करणेत यावी.परंतू थकीत कराच्या रक्कमेचा संबंधितांनी भरणा नगरपरिषद कार्यालाकडे करणेत यावा. सबब, चालु आर्थिक वर्षाची मालमता कराची चालु मागणी शून्य करून मागील थकीत कराच्या रक्कमेची बीले संबंधितांना बजावणेत यावीत.तरी दूरसंचार कायदा 2023 आणि दूरसंचार नियम 2024 ची अंमलबजावणी करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक  07/07/2025 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.68

विषय – विटा नगरपरिषद हद्दीतील साळशिंगे रोड येथील आय .टी.आय. कॉलेज समोर, मुजावर कॉलनी मधील मस्जिद जवळ 2 (मोहम्मदिया मस्जिद, सुन्नी मोहम्मदिया मस्जिद) व डवरी वसाहत येथे हायमास्ट उभे करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ-  1) मा.मुख्याधिकारी यांनी विदयुत अंभियंता यांची दिनांक 04/07/2025 रोजी मंजूर केलेली टिपणी.

2) आय टी आय कॉलेज परिसर व डवरी वसाहत येथील नागरिक यांचा अर्ज दि. 04/07/2025

विटा नगरपरिषद हद्दीतील साळशिंगे रोड येथील आय .टी.आय. कॉलेज समोर, मुजावर कॉलनी (मोहम्मदिया मस्जिद, सुन्नी मोहम्मदिया मस्जिद) व डवरी वसाहत येथे रात्रीच्या वेळी व पहाटे ज्येष्ठ नागरिक, महिला व वसतिगृहातील मुला-मुलींची ये-जा सुरु असते. सदर ठिकाणी अपुरी विद्युत व्यवस्था असलेने नागरिकांची गैरसोय होत आहे. तसेच नागरिकांना रात्री अपरात्री भटक्या जनावरांचा व कुत्र्यांचा त्रास होत असलेने सदर ठिकाणी हायमास्ट पोल उभे करून विद्युत व्यवस्था करणेबाबत संदर्भीय अर्ज प्राप्त झालेला आहे. सदर ठिकाणी एकूण 4 हायमास्ट पोल उभे करणे गरजेचे आहे. तरी सदर ठिकाणी हायमास्ट पोल उभे केल्यास तेथील लोकांची गैरसोय दूर होणार आहे. तरी विटा नगरपरिषद हद्दीतील साळशिंगे रोड येथील आय .टी.आय. कॉलेज समोर, मुजावर कॉलनी मधील मस्जिद जवळ 2 (मोहम्मदिया मस्जिद, सुन्नी मोहम्मदिया मस्जिद) व डवरी वसाहत येथे हायमास्ट उभे करणेस मंजूरी देत आहे. यासाठी येणारा खर्च नगरपरिषद फंडातून करणेत यावा.याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 07/07/2025 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 69

विषय – विटा नगरपरिषद हद्दीतील लिंगायत समाज स्मशानभूमी येथे हायमास्ट उभा करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा.मुख्याधिकारी यांनी विदयुत अंभियंता यांची दिनांक 04/07/2025 रोजी मंजूर केलेली टिपणी.

2) समस्त लिंगायत समाज स्मशानभूमी विश्वस्त मंडळ, विटा यांचा अर्ज दि. 02/07/2025

विटा नगरपरिषद हद्दीतील खानापूर रोडला असलेल्या लिंगायत समाज स्मशानभूमी येथे अपुरी विद्युत व्यवस्था असलेने कोणी रात्री अपरात्री मयत झाले तर अंत्यसंस्कार करणे गैरसोयीचे होत आहे. तसेच रात्रीच्या वेळी घडणाऱ्या गैरकृत्यांना आळा बसावा म्हणून सदर ठिकाणी हायमास्ट पोल उभा करून विद्युत व्यवस्था करणेबाबत संदर्भीय अर्ज प्राप्त झालेले आहेत. सदर ठिकाणी अपुरी विद्युत व्यवस्था असलेने हायमास्ट पोल उभा करणे गरजेचे वाटते. सदर ठिकाणी हायमास्ट पोल उभा केल्यास लोकांची गैरसोय दूर होणार आहे. तरी विटा नगरपरिषद हद्दीतील लिंगायत समाज स्मशानभूमी येथे हायमास्ट उभा करणेस मंजूरी देत आहे. यासाठी येणारा खर्च नगरपरिषद फंडातून करणेत यावा.याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा